प्रकरण क्रमांक ०४ पाहता, ठाणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या आस्थापनेवरील अन्न निरीक्षक या संवर्गात सेवेत असलेले श्री.महादेव जगताप हयांची मुंबई विद्यापीठाचे सिनेट सदस्य पदी निवड झाल्याबदद्ल ही समिती त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे .

ठाणे महानगरात राबविण्यात येणा-या विविधि शैक्षणिक प्रकल्प, शासकीय योजना हयांचा लाभ,इ.शैक्षणिकदृष्टया योजनांचा लाभ या महानगरास होण्याकरीता श्री.महादेव जगताप हे या महानगरपालिकेस सर्वतोपरी सहकार्य व मार्गदर्शन करतील असा विश्वास या समितीस वाटतो.

श्री.महादेव जगताप , अन्न निरीक्षक,आरोग्य विभाग,ठाणे महानगरपालिका हयांची मुंबई विद्यापीठ सिनेट सदस्य पदी निवड झाल्याबदद्ल पुनश्चः एकवार अभिनंदन व भविष्यकाळातील विविध योजनांस हार्दिक शुभेच्छा हया समितीचे सदस्य देत आहेत.

शुभेच्छासह..

सूचक : श्री.आनंदा केसरे अनुमोदकःश्री.दिनेश पाथरे

*सर्वानुमते मंजूर.*

प्रकाश राऊत : सभापती
आरोग्य, परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

मा.सभापती सभा ठीक दुपारी १२.४० वा. संपल्याचे जाहिर करतांत.

सचिव कार्यालय **( सौ.छाया मानकर )**
ठाणे महानगरपालिका,ठाणे. महापालिका सचिव
सभा दिनांकः ३०/१२/२०१० ठाणे महानगरपालिका,ठाणे.
सभा संपल्याची वेळ :दुपारी १२.४० वा.

**ठाणे महानगरपालिका,ठाणे.**

सचिव विभाग
ठाणे महानगरपालिका,ठाणे.
दिनांक : २६/११/२०१०

**मा.क्रीडा,समाजकल्याण व सांस्कृ. कार्यक्रम समिती सभा**
**सभा सूचना क्रमांक ०२ दिनांक : १९/११/२०१० ची**
**सभा क्रमांक ०२ दिनांक : २६/११/२०१०**

ठाणे महानगरपालिकेच्या मा.क्रीडा,समाजकल्याण व सांस्कृ. कार्यक्रम समितीची सभा **शुक्रवार दि.२६ नोव्हेंबर २०१० रोजी सकाळी ११.३०** वा.महिला विश्रांती कक्ष,३ रा मजला, महापालिका भवन, पांचपाखाडी,ठाणे येथे सभा सूचना क्रमांक ०२ दि.१९/११/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचारविनिमय करण्यासाठी बोलाविण्यात आली होती. सदर सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.सुधीर बर्गे | सभापती |
| २. | श्री.घनश्याम कणसे | सदस्य |
| ३. | श्री.संतोष वडवले | सदस्य |
| ४. | श्री.संजय प्र. सोनार | सदस्य |

खालीलप्रमाणे सन्मा. सदस्य गैरहजर होते.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.सुधीर कोकाटे | सदस्य |
| २. | श्री.सुधीर भगत | सदस्य |
| ३. | श्री.संतोष साळवी | सदस्य |
| ४. | श्री.रविंद्र मा.पाटील+ | सदस्य. |
| ५. | श्री.महेंद्र कोमुर्लेकर | सदस्य |

( राष्ट्रगीताने सभेस सुरुवात होते .)

मा. सचिव सभेचा अजेंडा वाचुन सभेस सुरुवात करतात.

मा. सचिव प्रकरण क्रमांक ०२ वाचुन दाखवितात.

प्रकरण क्र. २ मंजूर

मा.सभापती :

क्रीडा समितीच्या सभापती पदाची सूत्रे हाती घेतल्यापासून ही पहिलीच सभा असून आपणा सर्व सदस्य व अधिकारी वर्गाचे मी स्वागत करीत आहे . महापालिकेच्या अखत्यारीतील दादोजी कोंडदेव क्रीडाप्रेक्षागृह मा.आयुक्त महोदय यांनी फक्त खेळासाठीच वापरावे असा आदेश निर्गमित केलेला आहे . या संदर्भात निर्णय घेतांना क्रीडा समिती सभापती व आमच्या सद स्यांना विश्वासात घेण्यात आलेले नाही . या संदर्भात दौरा करतांनातरी सभापतींना आमंत्रित करणे अनिवार्य होते असे माझे मत आहे .जर फक्त खेळाचे आयोजन करावयाचे आहे तर याबाबतची वार्षिक क्रीडा रुपरेषा तयार आहे का . प्रशासनाने याची माहिती द्यावी .

श्री.संजय सोनार :

मा.सभापती महोदय,महापालिकेच्या दादोजी कोंडदेव क्रिडाप्रेक्षागृहाच्या विविध कामांसाठी जी आर्थिक तरतूद ठेवण्यात आलेली आहे त्यामध्ये किती काम पूर्ण झालेले आहे, किती शिल्लक आहे, सद्या कोणते काम चालू आहे, क्लब हाऊस गळते आहे त्याची काम केले का , याबाबत सविस्तर माहिती द्यावी

क्रीडा अधिकारी:

मा.सभापती महोदय, महापालिकेच्या दादोजी कोडदेव स्टेडीयममध्ये जी कामे चालू आहेत त्याची यादी वाचून दाखवितांत तसेच इतर कामांचा प्रस्ताव तयार करण्याबाबत संबंधित कार्यकारी अभियंता हयांचेकडे पत्रव्यवहार केलेला आहे.

श्री. घनश्याम कणसे :

मा.सभापती महोदय, महापौर चषक क्रीडा अंतर्गत किती आर्थिक तरतूद केली आहे व किती खर्च आतपर्यन्त कोणत्या खेळासाठी करण्यात आलेला आहे याची माहिती द्यावी

श्री.संजया सोनार :

सभापती महोदय, महापौर चषक क्रीडा आयोजनासाठी जी तरतूद ठेवली होती त्यापैकी मागील वर्षी काही रक्कम शिल्लक होती ती लॅप्स झाली का . यावर्षी लॅप्स होऊ नये म्हणून काय कार्यवाही केली.

मा.सभापती :

यापुढे स्पर्धा आयोजित करतांना संबंधित खेळाच्या संघटनेचे पदाधिकारी, व समिती सदस्य यांचेसमवेत माझे दालनात चर्चा करुनच स्पर्धेचे आयोजन करावे. तशा सूचना संबधितांना द्याव्यात . तसेच झालेल्या खर्चाचा हिशोब सबंधित संस्थेकडून मागविण्यात यावा. सर्व सन्मा.समिती सदस्यांना महापौर चषक क्रीडा स्पर्धा आयोजन, खर्च, स्थळ निश्चिती याबाबतची यादी वितरीत करण्यात यावी . सद्या महापालिकेच्या हद्द्तील तरण तलावांची अवस्था अत्यंत शोचनीय आहे तरण तलावांची दुरुस्ती व सुशोभिकरण करणे सुरक्षारक्षक इ. आवश्यक आहे .याबाबत विभागाने काय कार्यवाही केली याचा अहवाल द्यावा .तसेच समाज विकास विभागाकडून क्रीडा समितीकडे असलेल्या योजनांची अंमलबजावणी का होत नाही . याबाबत अहवाल द्यावा .

व्यवस्थापकः तरण तलाव :

मा.सभापती महोदय, तरण तलाव दुरुस्ती व बांधणीचे प्रस्ताव तयार केलेले असून संबंधित विभागाकडे पाठविण्यात आलेले आहेत .

श्री.संतोष वडवले :

मा.सभापती महोदय, क्रीडा,समाजकल्याण व सांस्कृ. कार्यक्रम समितीचे इतर महानगरपालिकांमधील कामकाज पाहण्यासाठी व त्या समितीमार्फत योजना कशा प्रकारे राबविण्यात येतांत याचा अहवाल घेण्यासाठी आपल्या समिती सदस्यांचा एक अभ्यास दौरा आयोजित करण्यात यावा अशी सूचना आहे . याबाबत संबंधितांना आदेश व्हावेत .

मा.सभापती :

सभापती पदी सूत्रे हाती घेतल्यानंतर ही माझी पहिलीच सभा आहे. आपण या बैठकीत उपस्थित राहून चांगल्या प्रकारच्या सूचना केल्याबदद्ल व मार्गदर्शन के ल्याबद्ल मी सर्व सन्मा.सदस्यांना धन्यवाद देतो व यापुढेही अशाच प्रकारचे सहकार्याची व मार्गदर्शनाची अपेक्षा आहे. तसेच सर्व सन्मा.अधिकारी वर्गाने केलेल्या सहकार्याबदद्ल धन्यवाद देतो. अभ्यास दौ-याचे आयोजन करण्याचे दृष्टीने समाज विकास अधिकारी हयांनी पुढील कार्यवाही सत्वर करावी .

प्रकरण क्र. : ०२ : मा.क्रीडा, समाजकल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समितीचे

दि. १२/३/२०१० व दि. १५/७/२०१० रोजीच्या सभेचे इतिवृत्त मंजूर

करणेबाबत.

मा.क्रीडा ,समाजकल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती ठराव क्र. ०२ दिनांक :

२६/११/२०१०

ठ रा व :-

प्रकरण क्रमांक ०२ पाहता, मा. क्रीडा,समाजकल्याण, व सांस्कृतिक कार्यक्रम समितीच्या दि. १२/३/२०१० व दि. १५/७/२०१० रोजीच्या इतिवृत्त सभेचे इतिवृत्तांत ही समिती वाचून कायम करीत असून अंतिम मान्यतेसाठी मा.महासभेपुढे सादर करण्यास शिफारस आहे .

सूचक : संतोष वडवले अनुमोदकः संजय सोनार

*सर्वानुमते मंजूर.*

सुधीर बर्गे : सभापती
क्रीडा,समाजकल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती
ठाणे महानगरपालिका,ठाणे

अशा प्रकारे साधकबाधक चर्चा झाल्यानंतर सायंकाळी १२.०० वाजता सभापती सभा संपल्याचे जाहिर करतात.

सचिव कार्यालय **( सौ.छाया मानकर )**
ठाणे महानगरपालिका,ठाणे. महापालिका सचिव
सभा दिनांकः२६/११/२०१० ठाणे महानगरपालिका,ठाणे.
सभा संपल्याची वेळ :दु.१२.०० वा.

**ठाणे महानगरपालिका,ठाणे.**

सचिव विभाग
ठाणे महानगरपालिका,ठाणे.
दिनांक : १५ जुलै २०१०

**मा.महिला व बालकल्याण समिती**
**मा.क्रीडा,समाजकल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती**
**मा.आरोग्य, परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती**
**मा.गलिच्छ वस्ती निर्मूलन समिती**
**मा.माध्यमिक व पूर्व प्राथमिक शिक्षण समिती**

**सभा सूचना क्रमांक ०१ दिनांक :०५ /०७/२०१०**
**सभा क्रमांक ०१ दिनांक १५/०७/२०१०**

ठाणे महानगरपालिकेच्या **मा.महिला व बालकल्याण समिती मा.क्रीडा,समाजकल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती मा.आरोग्य, परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती, मा,गलिच्छ वस्ती निर्मूलन समिती, मा.माध्यमिक व पूर्व प्राथमिक शिक्षण समिती** सभापती पदाची निवड करण्याकरीता **सभा गुरुवार दि.१५ जुलै २०१० रोजी सकाळी ११.०० वा.** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह, पालिकामुख्यालय,ठाणे येथे सभा सूचना क्रमांक ०१ दि.०५/०७/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचारविनिमय करण्यासाठी बोलाविण्यात आली होती. सदर सभेस सन्मा.सदस्य उपस्थित होते.

( सभेचे पिठासिन अधिकारी म्हणून ठाणे जिल्हाधिकारी मा.श्री.ए. एल. जन्हाड हे उपस्थित होते.)
राष्ट्रगीताने सभेस सुरुवात होते .

मा.महापालिका सचिव विषयपत्रिका वाचून दाखवितांत.

सौ.छाया मानकर : महापालिका सचिव :
मा. पिठासिन अधिकारी महोदय,मा.राज्य शासनाचे १७/२/२००७ रोजीच्या अधिसूचनेतील ६ (२) अन्वये पालिकेतील पांच विशेष समिती सभापती पदाची निवड आयोजित करण्यात आलेली असून ९ जुलै २०१० रोजीपर्यन्त चार विशेष समितीनिहाय सभापती पदासाठी प्रत्येकी केवळ एकच नामनिर्देशन पत्र प्राप्त झालेली असून क्रीडा,समाजकल्याण व सांस्कृ कार्यक्रम समितीसाठी दोन नामनिर्देशन पत्रे दाखल झालेली आहे. सदरची नामनिर्देशन पत्रे मा.पिठासिन अधिकारी हयांचेकडे सुपूर्द करीत आहे.

मा.पिठासिन अधिकारी तथा जिल्हाधिकारी :( श्री.ज-हाड सो)

पांच विशेष समिती सभापती पदासाठी अनुक्रमे :

१)मा.महिला व बालकल्याण समिती सौ.वनिता गंगाराम इंदिसे

२) मा.माध्यमिक व पूर्व प्राथमिक शिक्षण समिती श्री.रमाकांत दशरथ मढवी

३)मा.गलिच्छ वस्ती निर्मूलन समिती, श्रीमती राधा फ. सिंह

४)मा.आरोग्य परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती, श्री.प्रकाश हरिश्चंद्र राऊत

वरीलपैकी प्रथम चार विशेष समित्यांचे नामनिर्देशन पत्रे वैध असल्याचे मी जाहिर करीत आहे . तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे तरतूदीन्वये क्रीडा,समाजकल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती सभापती पदाकरीता दोन नामनिर्देशन पत्रे दाखल झालेली असून उमेदवारास नामनिर्देशन पत्रे मागे घेण्याकरीता १५ मिनिटांचा अवधी देत आहे . उमेदवाराने स.११.१५ ते ११.३० या दरम्याने आपली उमेदवारी मागे घेऊ शकतो .

श्री.महेंद्र कोमुर्लेकर :

मा.पिठासिन अधिकारी महोदय, जर मला क्रीडा,समाजकल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समितीचा सदस्य पदाचा राजीनामा द्यावयाचा झाल्यास तो कोणाकडे सुपूर्द करावा याचे मार्गदर्शन व्हावे.कारण या समितीवर मी सदस्य म्हणून निवडून आलेलो आहे हे मला आज विषयपत्रिका बघितल्यावर समजते . वास्तविक सदस्य म्हणून निवड करतांना आम्हास विचारलेले नाही किंवा विश्वासातही घेतलेले नाही.

मा.पिठासिन अधिकारी / जिल्हाधिकारी :

विशेष समिती सदस्य पदाची निवड ही मा.सर्वसाधारण सभेत होत असते. त्यामुळे आपणांस त्याची कल्पना असेलच . ही सर्व सदस्य पदाची नांवे सर्वसाधारण सभेत जाहिर होत असतांत. शिवाय आपण जो मुदद्‌ उपस्थित केलेला आहे की, सदस्य पदाचा राजीनामा देऊ शकतो का ? ही बाब माझ्या कार्यकक्षेत येत नाही. मी आज रोजी फक्त विशेष समिती सभापती पदाची निवड प्रक्रीयेसाठी पिठासिन अधिकारी म्हणून काम करीत आहे.

आपणांस आता फक्त उमेदवारी मागे घेण्यासाठी १५ मिनिटांचा अवधी देण्यात येत आहे .

पंधरा मिनिटांचा उमेदवारी मागे घेण्याचा अवधी संपल्याबाबत मा.पिठासिन अधिकारी घोषित करतांत व निवडणूक निकालपत्र घोषित करतांत.

# *निवडणूक निकाल पत्र*

**मा.विशेष समिती ठराव क्र. ०१ दिनांक : १५/७/२०१०**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ ( स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती व इतर समित्यांचे सभापती हयांची निवडणूक घेणे ) मधील नियम ५ (२) अन्वये मा. महिला व बालकल्याण समिती सभापती पदासाठी एकच उमेदवार वैधरित्या नामनिर्देशित झाले होते.

एक पद व एक उमेदवार असल्याने **सौ.वनिता गंगाराम इंदिसे हया सन २०१०-२०११** या कालावधीसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमांतील नगर विकास विभागाकडील अधिसूचना दि.१७/२/२००७ चे नियम ६ (१) **नुसार बिनविरोध महिला व बालकल्याण समिती सभापती** पदी निवडून आल्याचे मी घोषित करीत आहे.

पीठासीन अधिकारी<br>
तथा<br>
जिल्हाधिकारी, ठाणे

# *निवडणूक निकाल पत्र*

मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ ( स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती व इतर समित्यांचे सभापती हयांची निवडणूक घेणे ) मधील नियम ५ (२) अन्वये मा. माध्यमिक व पूर्व प्राथमिक शिक्षण समिती सभापती पदासाठी एकच उमेदवार वैधरित्या नामनिर्देशित झाले होते.

एक पद व एक उमेदवार असल्याने **श्री.रमाकांत दशरथ मढवी हे सन २०१०-२०११** या कालावधीसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमांतील नगर विकास विभागाकडील अधिसूचना दि.१७/२/२००७ चे नियम ६ (१) नुसार **बिनविरोध**

**माध्यमिक व पूर्व प्राथ. शिक्षण समिती सभापती पदी** निवडून आल्याचे मी घोषित करीत आहे.

पीठासीन अधिकारी
तथा
जिल्हाधिकारी, ठाणे

# *निवडणूक निकाल पत्र*

मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ ( स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती व इतर समित्यांचे सभापती हयांची निवडणूक घेणे ) मधील नियम ५ (२) अन्वये मा. आरोग्य,परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती सभापती पदासाठी एकच उमेदवार वैधरित्या नामनिर्देशित झाले होते.

एक पद व एक उमेदवार असल्याने **श्री.प्रकाश हरिश्चंद्र राऊत हे सन २०१०-२०११** या कालावधीसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमांतील नगर विकास विभागाकडील अधिसूचना दि.१७/२/२००७ चे नियम ६ (१) नुसार **बिनविरोध आरोग्य,परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती सभापती** पदी निवडून आल्याचे मी घोषित करीत आहे.

पीठासीन अधिकारी
तथा
जिल्हाधिकारी, ठाणे

# *निवडणूक निकाल पत्र*

मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ ( स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती व इतर समित्यांचे सभापती हयांची निवडणूक घेणे ) मधील नियम ५ (२) अन्वये मा. गलिच्छ वस्ती निर्मूलन समिती सभापती पदासाठी एकच उमेदवार वैधरित्या नामनिर्देशित झाले होते.

एक पद व एक उमेदवार असल्याने **श्रीमती राधा फ. सिंह हया सन २०१०-२०११** या कालावधीसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमांतील नगर विकास विभागाकडील अधिसूचना दि.१७/२/२००७ चे नियम ६ (१) नुसार **बिनविरोध गलिच्छ वस्ती निर्मूलन समिती सभापती** पदी निवडून आल्याचे मी घोषित करीत आहे.

पीठासीन अधिकारी
तथा
जिल्हाधिकारी, ठाणे

# *निवडणूक निकाल पत्र*

मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ ( स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती व इतर समित्यांचे सभापती हयांची निवडणूक घेणे ) मधील नियम ५ (२) अन्वये मा. क्रीडा,समाजकल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती सभापती पदासाठी दोन उमेदवार वैधरित्या नामनिर्देशित झाले होते.

१) श्री. रविंद्र माणिक पाटील

२) श्री.सुधीर प्रल्हाद बर्गे

३)

वरील दोन उमेदवारांपैकी एक उमेदवाराने अपली उमेदवारी मागे घेतली त्यांचे नांव श्री.रविंद्र माणिक पाटील ,त्यामुळे एक पद व एक उमेदवार शिल्लक असल्याने **श्री.सुधीर प्रल्हाद बर्गे** **सन २०१०-२०११** या कालावधीसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमांतील नगर विकास विभागाकडील अधिसूचना

दि.१७/२/२००७ चे नियम ६ (१) नुसार **बिनविरोध क्रीडा,समाजकल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती सभापती** पदी निवडून आल्याचे मी घोषित करीत आहे.

पीठासीन अधिकारी
तथा
जिल्हाधिकारी, ठाणे

वरीलप्रमाणे निवडणूक प्रक्रीया पूर्ण झाल्याचे मा.पिठासिन अधिकारी घोषित करतांत व ठीक स.११.३५वा. सभा संपल्याचे जाहिर करतांत.

सचिव कार्यालय
ठाणे महानगरपालिका,ठाणे.
सभा दिनांकः १५/०७/२०१०
सभा संपल्याची वेळ : स.११.३५ वा.

**( सौ.छाया मानकर )**
महापालिका सचिव
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

**ठाणे महानगरपालिका,ठाणे.**

सचिव विभाग
ठाणे महानगरपालिका,ठाणे.
दिनांक : १६/११/२००९

**मा.माध्यमिक व पूर्व प्राथ.शिक्षण समिती सभा**

**सभा सूचना क्रमांक २ दिनांक : ०९/११/२००९**

**सभा क्र. २ दिनांक : १६/११/२००९**

ठाणे महानगरपालिकेच्या मा. माध्यमिक व पूर्व प्राथ.शिक्षण समितीची सभ**ा सोमवार दि.१६/११/२००९ रोजी दुपारी ०३.३० वा.**क्रीडा समिती सभागृह, २ रा मजला, महापालिका भवन, पांचपाखाडी,ठाणे येथे सभा सूचना क्रमांक २ दि.०९/११/२००९ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचारविनिमय करण्यासाठी बोलाविण्यात आली .

**सदर सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १. | सौ.अनिता सावंत | सभापती |
| २. | सौ.अनिता गौरी | सदस्य |
| ३ | सौ.सुहासिनी लोखंडे | सदस्या |
| ४. | श्री.दशरथ बा. पालांडे | सदस्या |
| ५. | श्री.शैलेश सावंत | सदस्य |

**सभेस गैरहजर सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| १. | सौ.अनिता किणे | सदस्या |
| २. | सय्यद अली अश्रफ | सदस्य |
| ३. | श्री.मिलिंद पाटील | सदस्य |
| ४. | श्रीमती हफीजा न. नाईक | सदस्या |

सचिव सभेचा अजेंडा वाचून दाखवितांत. प्र.क्र. २ पुकारतांत .

प्रकरण क्र. २ मंजूर
प्रकरण क्र. ३ मंजूर

सौ.अनिता गौरी :

मा.सभापती महोदया, या समितीच्या कामकाजाची कक्षा आम्हाला समजावून सांगण्यात यावी. आम्ही या समिती सभेमध्ये चर्चा करतो व त्याची अंमलबजावणी प्रशासनाकडून होत नाही याची खंत वाटते. महापालिका अखत्यारीतील विविध शाळा इमारतीमध्ये अनेक त्रूटी आहेत . त्या त्रूटीसंदर्भात चर्चा करुन कायम स्वरुपी निर्णय घेणे गरजेचे आहे . उदाहरण द्यावयाचे झाल्यास,महापालिकेच्या राबोडी येथील उुर्द शाळेत एकच शिक्षिका भरण्यात आलेली असून तीच शिक्षिका सर्व काम पहाते. एकच शिक्षिका तीन वर्गाचे काम कशी पाहणार याचा उलगडा होत नाही शाळांमध्ये सुरक्षा रक्षक नाही,उथळसर शाळेत तीन महिन्यांपासून पाणी नाही, बेचेंस नाहीत,शाळा क्र. ६मध्ये एक लिपिक देणे आवश्यक आहे, शिक्षकांची भरती करणे आवश्यक आहे ,

श्री.दशरथ पालांडे :

मा.सभापती महोदया, आजच्या सभेमध्ये शाळांच्या त्रूटींबाबत चर्चा करण्यासाठी व त्यावर निर्णय घेण्यासाठी त्या विभागाचा खाते प्रमुख नसतांना या चर्चेस काहीच अर्थ ऊरत नाही . खाते प्रमुख व संबंधित विभागाचे अधिकारी असल्यावरच त्यावर निर्णय घेता येणे शक्य आहे .

मा.सचिव :

माध्यमिक शिक्षण विभागाच्या सहाय्यक आयुक्त सौ.गीता कुलकर्णी हे मा.आयुक्तांचे आदेशान्वये आज पोलिस बंदोबस्त प्राप्त झाल्याने अतिक्रमण कारवाईवर गेलेल्या असल्याने बैठकीस येऊ शकत नाही .

सौ.अनिता गौरी :

मा.सभापती महोदया, एका अधिका-यास एकच कार्यभार सांभाळण्यास द्यावा . दोन दोन कार्यभार दिल्याने दोन्हीकडे कार्यालयीन कामकाज करणे मुष्किल होते . अनेक वेळेला बैठका

आयोजित करुनसुध्द् अधिकारी वर्ग उपस्थित रहात नाही . त्यामुळे एखादया विषयावर निर्णय घेणे दुरापास्त होते .याबाबत निश्चित धोरण आखावे अशी सूचना आहे.
श्री.दशरथ पालांडे :

मा.सभापती महोदया, माझी अशी सूचना आहे की, महापालिका अखत्यारीतील शाळा इमारतींच्या दुरुस्तीसाठी / पुर्नबांधणीसाठी पालिकेच्या अर्थसंकल्पात स्वतंत्र लेखाशिर्ष उघडून तरतूद करण्यात यावी. जेणेकरुन शाळा दुरुस्ती वा पुर्नबांधणी करणे सुलभ होईल.
सौ.अनिता गौरी :

मा.सभापती महोदाय,सन्मा.सदस्य श्री.पालांडे हयांनी जी सूचना मांडलेली आहे त्यास माझे अनुमोदन आहे.
मा.सभापती :

सन्मा.सदस्यांचे सूचनेनुसार शाळा दुरुस्तीसाठी स्वतंत्र लेखाशिर्ष उघडून त्यामध्ये तरतूद करण्याबाबतचा ठराव आजच्या सभेत पारित करण्यात यावा.
सौ.अनिता गौरी :

मा.सभापती महोदया, महापालिका शाळांना पालिकेतर्फे वॉटर कुलर -ॲक्वॅगार्डसह पुरविण्यात यावे,शाळा क्र. ३ व ५ मध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी ,लिपिक,सुरक्षा रक्षक,शिक्षकांची भरती,साफसफाई करीता सफाई कामगार, शाळांची दुरुस्ती व रंगरंगोटी करणे, पदोन्नतीची कार्यवाही करणे,
मुख्याध्यापकांची नियुक्ती करणे, वाळवीचा बंदोबस्त, लिपिक उपलब्ध करुन देणे या कामांची पूर्तता करावी
श्री.शैलेश सावंत :

मा.सभापती महोदया, महापालिकेच्या शाळा क्र. १८ मधील खालील त्रूटींची पूर्तता करावी.

१. शाळा क्र. १८ मध्ये जी अनावश्यक शेड उभारण्यात आलेली आहे त्यावर कारवाई करणे
२. परिसर साफसफाई करणे,रंगरंगोटी करणे
३. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे
४. शाळा क्र. १८ येथे बालवाडी सुरु करण्याबाबत

मा.सभापती :

सन्मा.सदस्यांनी आजच्या बैठकीत ज्या ज्या सूचना केलेल्या आहेत त्याबाबत संबंधित अधिकारी वर्गाने योग्य ती दखल घेऊन प्रशासकीय कार्यवाही करावी .

प्रक्रण क्र. ०३ : मा.माध्यमिक व पूर्व प्राथमिक शिक्षण समितीचे दि.१६/११/२००९ व दि.१५/७/२०१० रोजीच्या सभेचे इतिवृत्त मंजूर करणेबाबत.

मा.माध्यमिक व पूर्व प्राथमिक शिक्षण समिती ठराव क्रमांक ०३ दिनांक : ---------

ठ रा व :-

प्रकरण क्रमांक ०३ पाहता, मा. माध्यमिक व पूर्व प्राथमिक शिक्षण समिती दि.१६/११/२००९ व १५/७/२०१० रोजीच्या सभेचे इतिवृत्तांत ही समिती वाचून कायम करीत असून अंतिम मान्यतेसाठी मा.महासभेपुढे सादर करण्यास शिफारस आहे .

सूचक : अनुमोदकः

*सर्वानुमते मंजूर.*

सभापती
माध्यमिक व पूर्व प्राथ.शिक्षण समिती
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

प्रक्रकरण क्र. ०३ : महापालिका माध्यमिक शाळा क्र. ७ : वाढीव तुकडयांना मान्यता मिळणेबाबतचे प्रकरण मान्यतेसाठी..

मा.माध्यमिक व पूर्व प्राथमिक शिक्षण समिती ठराव क्रमांक ०३ दिनांक : १६/११/२००९

ठ रा व :-

प्रकरण क्र. ०३ पाहता व त्यावर चर्चा करता, ठाणे महापालिकेच्या एकूण ८ माध्यमिक शाळा असून त्यामधील मानपाडा येथील शाळा क्र. ०७ या शाळेमध्ये एकूण ५०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. इयत्ता ८ वी २२६, इयत्ता ९ वी १५७ व इयत्ता १० वी १२५ इतके विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. पैकी इयत्ता ८ वीचे ४ वर्ग सुरु असून ०२ वर्गांना शासनाची मान्यता आहे.इयत्ता ९ वी ०३ वर्ग सुरु असून दोन वर्गाना शासनाची मान्यता आहे., इयत्ता १० वी चे ०३ वर्ग सुरु असून दोन वर्गांना शासनाची मान्यता आहे. म्हणजे दिवसेंदिवस शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांची लक्षात घेता तुकडया वाढविणे अनिवार्य आहे . त्या अनुषंगाने मानपाडा येथील शाळेत तुकडया वाढविण्यात आल्या होत्या.

परंतु अशा प्रकारे तुकडया वाढविण्यास राज्य शासनाची मान्यता आवश्यक आहे असा अहवाल प्रशासनाने सादर केलेला आहे. .

सबब प्रशासनाकडील अहवात पाहता तसेच लोकसंख्येच्या मानाने म्हणजे विद्यार्थी संख्या लक्षात घेता महापालिका शाळा इमारतीमध्ये अपु-या तुकडया असल्याने त्या वाढविणे अनिवार्य आहे . ही बाब लक्षात घेऊन प्रशासनाने केलेली कार्यवाही योग्य आहे असे या समितीचे मत आहे . तथापि, महापालिकेच्या मानपाडा येथील शाळा क्र. ०७ मधील इयत्ता ८ वीची एक तुकडी, इयत्ता ९ वीची एक तुकडी व इयत्ता १० वीची एक तुकडी

वाढविण्यास या समितीची कोणतीही हरकत नाही . परंतु अशा प्रकारे तुकडी वाढविण्यास शासनाची मान्यता

अनिवार्य असल्याने ही समिती शाळा क्र. ७ मधील वाढीव तुकडयांना राज्य शासनाची मान्यता मिळणेस शिफारस करीत आहे.

पुढील योग्य ती कार्यवाही प्रशासनाने करावी असे ही समिती ठरवित आहे.

सूचक : सौ.अनिता गौरी अनुमोदक :शैलेश सावंत

सर्वानुमते मंजूर..

सौ.अनिता सावंत:सभापती
माध्यमिक व पूर्व प्राथमिक शिक्षण समिती
ठाणे महानगरपालिका,ठाणे

आयत्या वेळेचा ठराव क्र. ०४: महापालिका अखत्यारीतील शाळा इमारत दुरुस्तीसाठी स्वतंत्र लेखाशिर्ष उघडून आर्थिक तरतूद करण्याबाबत..

मा.माध्यमिक व पूर्व प्राथमिक शिक्षण समिती ठराव क्र. ०४ दिनांक : १६/११/२००९

ठ रा व :

प्रकरणी चर्चा करतां, ठाणे महापालिका अखत्यारीतील शाळा इमारतींची सद्याची दुरावस्था व शोचनीय परिस्थिती लक्षात घेता शाळा इमारतींची पुर्नबांधणी वा दुरुस्ती करणे आवश्यक आहे असे या समितीचे मत आहे .परंतु याकरीता स्वतंत्र लेखाशिर्ष उघडणेबाबत सन्मा.सदस्यंनी सूचना केलेली आहे .

सबब सन्मा.सदस्यांचे सूचनेनुसार महापालिका हद्दीतील शाळा पुर्नबांधणी/दुरुस्ती याकरीता स्वतंत्र लेखाशिर्ष उघडण्यात येऊन पुरेशी आर्थिक तरतूद ठेवण्यात यावी अशी मा.महासभेस ही समिती शिफारस करीत आहे.

पुढील योग्य ती कार्यवाही प्रशासनाने करावी असे ही समिती ठरवित आहे.

सूचक : सौ.अनिता गौरी अनुमोदक:शैलेश सावंत

सर्वानुमते मंजूर..

सौ.अनिता सावंत :सभापती
माध्यमिक व पूर्व प्राथमिक शिक्षण समिती
ठाणे महानगरपालिका,ठाणे

मा.सभापती महोदय यांनी सभा ठीक सायं.४.४५ वा. संपल्याचे जाहिर केले.

सचिव कार्यालय
ठाणे महानगरपालिका,ठाणे. महापालिका सचिव
सभा दिनांक: १६/११/२००९ ठाणे
महानगरपालिका,ठाणे.
सभा संपल्याची वेळ : सायं.४.४५ वा

**ठाणे महानगरपालिका,ठाणे.**

सचिव विभाग
ठाणे
महानगरपालिका,ठाणे.
दिनांक :
०८/१२/२०१०

**मा.महिला व बालकल्याण समिती सभा**

**सभा सूचना क्रमांक ०३ दिनांक : २९/११/२०१०**

**सभा क्रमांक ०३ दिनांक ०८/१२/२०१०**

ठाणे महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची सभा **बुधवार दि.०८/१२/२०१० रोजी सकाळी ११.३० वा.** सभा सूचना क्रमांक ०३ दि. २९/११/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचारविनिमय करण्यासाठी बोलाविण्यात आली होती.

सदर सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | सौ.वनिता गं. इंदिसे | सभापती |
| २. | श्रीमती छाया म. राव | सदस्या |
| ३. | सौ.महेश्वरी तरे | सदस्या |
| ४. | कु.योगिता र. वैती | सदस्या |
| ५. | सौ.मिनाक्षी रा. शिंदे | सदस्या |
| ६. | सौ.अपर्णा साळवी | सदस्या |
| ७. | सौ.प्रमिला केणी | सदस्या |

**अनुपस्थित सदस्य :-.**

| | | |
|---|---|---|
| १. | सौ.स्वाती कोमुर्लेकर | सदस्या |
| २. | सौ.अन्सारी इ. बानू | सदस्या |

( राष्ट्रगीताने सभेस सुरुवात होते . )

( सौ.मानकर हयांचे अनुपस्थितीत श्री.मकरंद काळे सचिव पदी स्थानापन्न होतांत.)

(मा. सचिव सभेचा अजेंडा वाचून दाखवितांत.)

मा. सचिव प्र.क्र.०५ वाचून दाखवितांत

प्रकरण क्र.०५ मंजूर

मा.सचिव श्री.मकरंद काळे प्र.क्र.०६ वाचून दाखविंतांत

:सौ.भोसले ,मुख्याध्यापिका, जिदद् शाळा :

मा.सभापती महोदया, आता बैठक चालू आहे तर एक गोष्ट निदर्शनास आणून देऊ इच्छिते की, आपल्या जिदद् शाळेतील अपंग विद्यार्थीनी अनेक अडचणींना तोंड देत आहे शिवाया या शाळेत शिकून ज्या अपंग विद्यार्थीनी घरी गेलेल्या आहेत त्यांना घरातूनही वाईट वागणूक मिळते. समाजात कोठलेही स्थान नाही . सबब माझी सूचना आहे की, या अपंग विद्यार्थीनीसाठी वसतीगृ,ह बांधून देण्यात यावेत व त्याच ठिकाणी त्यांना एखादा व्यवसाय शिकविण्याचे प्रशिक्षण द्यावे जेणेकरुन त्यांचे पोट ते स्वतः भरु शकतील .

मा.सभापती :

या अपंग मुलींसाठी वसतीगृह बांधण्यास जागा असल्यास सूचविण्यात यावी प्रशासनाकडून निश्चित कार्यवाही करण्यात येईल. शहर विकास विभागाकडून याबाबत आरक्षित वा मोकळया भूखंडाची यादी मागविण्यात येईल .

कु.योगिता वैती

मा.सभापती महोदय, सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षात कोणकोणत्या योजना राबविण्यात येणार आहेत त्याची माहिती द्यावी .

( मा.समाज विकास अधिकारी श्री.पाटोळे सन २०१०-२०११ मधील योजनांची माहिती विषद करतांत.)

कु.योगिता वैती :

मा.सभापती महोदया, या वर्षीच्या योजना राबविण्यापूर्वी मागील वर्षी उर्वरित लाभार्थींना घरघंटी व शिलाई मशिन देण्याबाबत ठराव झालेला होता तसेच त्याकरीता आर्थिक तरतूदही करण्यात आली होती. संबंधित लाभार्थींना त्याकरीता टोकनही उपलब्ध करुन दिले . परंतु अद्यापही घरघंटी उर्वरित मागील वर्षीच्या लाभार्थीना देण्यात आलेली नाही. असे समजते की, मागील वर्षीना घरघंटी देण्याबाबतचे प्रकरण रदद् करण्यात आलेले आहे . रदद् करण्यात आले तर याची कल्पना सदस्य व लाभार्थींना का देण्यात आली नाही. असे असतांना यावर्षीच्या योजना राबविणे कितपत संयुक्तिक होईल.

सौ.मीनाक्षी शिंदे :

मा.सभापती महेदया, या वर्षीच्या योजनांमध्ये घरघंटी वितरीत करण्याबाबतची योजना रदद् करण्यात आलेली आहे . यापूर्वीच आम्ही आमच्या विभागातील नागरिकांना घरघंटी उपलब्ध

करुन देऊ असे आश्वासन दिलेले आहे . मागील वर्षी या योजनेची संपूर्णतया अंमलबजावणी झालेली नाही. तरी घरघंटी वितरीत योजना रदद् करण्यात येऊ नये .

श्री.पाटोळे : समाज विकास अधिकारी :

मा.सभापती महोदया ,वाढीव घरघंटी वितरण योजना रदद् करण्याबाबत गटनेत्यांच्या बैठकीत निर्णय घेण्यात आलेला असून मा.महासभेने विभागाकडील मागील वर्षीच उर्वरित लाभार्थींना घरघंटी वाटपाबाबतचा प्रस्ताव अमान्य केलेला आहे.या वर्षी योजना राबवितांना फॉर्म वाटप करतांना प्रत्येक फॉर्मवर सिरीयल क्रमांक ठेवेलेले असणार व प्रभाग निहाय फॉर्मचे वाटप होणार आहे . जेणेकरुन मागील वर्षीचा लाभार्थी यावर्षी रिपिट होणार नाही . याबाबतचे सॉफटवेअर तयार करण्यात येणार असून संगणकीय काम करणेत येणार आहे मागील वर्षीच्या सन २००९-२०१० उर्वरित लाभार्थींना घरघंटी वितरणाबाबत मा.महासभेने निर्णय घेतलेला असल्याने प्रशासन मा.महासभेच्या निर्णयात हस्तक्षेप करु शकत नाही .

श्रीमती छाया राव :

मा.सभापती महोदया , सन २००९-२०१० या आर्थिक वर्षातील घरघंटी वितरीत करणेबाबत वाढीव तरतूद करण्यात आली होती. व हया वाढीव घरघंटी ज्या लाभार्थींना टोकन दिलेले आहे त्यांना वितरीत करणे आवश्यक होते. परंतु आकस्मिकरित्या हे रद्द करण्यात आलेली आहे. याची माहिती सदस्यांनाही देण्यात आलेली नाही . या निर्णयाविरोधात काही महिला कोर्टात जाण्याची शक्यता आहे .

श्री.पवार, उपआयुक्त :

ठरावानुसार आम्ही प्रस्ताव सादर केलेला होता. परंतु मा.महासभेने आमचा प्रस्ताव अमान्य केलेला आहे त्याबाबत हस्तक्षेप आम्ही करु शकत नाही . महापालिकेकडून विनोमोबदला आपण वस्तूंचे वाटप करीत आहोत.जरी न्यायालयांत गेले तरी त्यांना कोणताही अधिकार नाही .त्यामुळे आपण बांधील नाही. महापालिकेने घेतलेला निर्णय आहे .

कु.योगिता वैती :

मा.सभापती महोदया , या वर्षीच्य योजनांसाठी महापालिकेने सिरीयल क्रमांक टाकून फॉर्म छपाई केले असून त्या फॉर्मची किंमत रु,१०/- ठेवण्यात आलेली आहे. हे फॉर्म मागील वर्षीसारखे मोफत का वाटप करण्यात येत नाहीत. मोफत वाटावे. प्रभाग समितीनिहाय फॉर्म वितरीत करणार आहांत. परंतु माझी अशी माहिती आहे की, एकगठठ्या फॉर्म नेले जातांत व ते प्रभागात त्या सदस्यांमार्फत मोफत वाटले जातांत . याची चौकशी व्हावी.

श्री.पवार, उपआयुक्त :

सन्मा.सदस्या कु.वैती हयांनी जो मुदद्‌ उपस्थित केलेला आहे त्यावर चौकशी करण्यात येईल.

सौ.अपर्णा साळवी :

मा.सभापती महोदया, या वर्षी वाटप झालेल्या फॉर्मची संख्या व भौतिक लक्ष लक्षात घेता प्रभागातील सर्व आर्थिकदृष्टया मागास असलेल्या अर्जदारांना याचा लाभ मिळणार नाही. हे वाटप कसे करणार आहांत.

श्री.पवार, उपआयुक्त

या वर्षी वाटप करतांना लॉटरी सिस्टीम ( सोडतीने) वापरणार आहोत. याव्यतिरिक्त आपण जर काही सूचना करीत असाल तर त्याचा प्रशासनाकडून निश्चित विचार करण्यात येईल.सन २०११-२०१२ या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये महिला व बालकल्याण समितीच्या सर्व योजनांचा तरतूदीनिहाय समावेश करण्यात यावा व याबाबत समाज विकास विभागाने कार्यवाही करावी .

सौ.महेश्वरी तरे :

मा.सभापती महोदया, मागील वर्षीचे घरघंटी वाटपाबाबत काय निर्णय झालेला आहे . मागील वर्षीच्या लाभार्थींना घरघंटी मिळालीच पाहिजे. तसेच यावर्षी वस्तूंचे वाटप करतांना स्थानिक नगरसेवकांना विश्वासात घेण्यात यावे . तसेच काही प्रभाग समितीत एकगठठ्‌ फॉर्म सदस्यांनी घेतल्याचे समजते. त्यावर कारवाई करण्यात यावी . तसेच संसारोपयागी साहित्य व साडी वाटप त्वरीत करण्यात यावे . तसेच या वर्षी अर्जदारांना सत्यप्रतिज्ञापत्र सक्तीने करण्यात येऊ नये. जे लाभार्थी पात्र होतील त्यांचेकडूनच सत्यप्रतिज्ञापत्र घेण्यात यावे अशी सूचना आहे. तसेच महिला व बालकल्याण समितीचा केरळ कन्याकुमारी अभ्यास दौ-याचे आयोजन करण्यात यावे .

सौ.अपर्णा साळवी :

मा.सभापती महोदया, प्रभाग निहाय आरोग्य शिबीराचे आयोजन करण्याबाबत संबंधित विभागास आदेश व्हावेत .

मा.सभापती :

सन्मा.सदस्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्याबाबत विभागाने कार्यवाही करावी .

प्रकरण क्र. ०७: महिला व बालकल्याण समितीचे दि.८ डिसेंबर २०१० रोजीच्या सभेचे इतिवृत्त मंजूर करणेबाबत.

मा.महिला व बालकल्याण समिती ठराव क्रमांक ०७ दिनांक : १३/०१/२०११

ठ रा व :

प्रकरण क्रमांक ०७ पाहता, महिला व बालकल्याण समिती दि. ८ डिसेंबर २०१० या सभेचे इतिवृत्तांत ही समिती कायम करीत असून अंतिम मान्यतेसाठी मा.महासभेपुढे सादर करण्यास शिफारस आहे

सूचक : सौ.महेश्वरी सं.तरे अनुमोदक:योगिता वैती

*सर्वानुमते मंजूर.*

सभापती
महिला व बालकल्याण
समिती
ठाणे
महानगरपालिका,ठाणे

**प्रकरण क्र. :- ०६**

विषय :- सन २०१०-२०११ या आर्थिकवर्षात शासनाच्या निर्देशानुसार विविध योजनांची अंमबजावणी करण्याचे दृष्टीने सविस्तर चर्चा करणेयबाबत..

**महिला व बालकल्याण समिती ठराव क्रमांक :- ०६ दिनांक :- ०८/१२/२०१०**

**ठ रा व :**

प्रकरणी चर्चा करतां , सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षात शासनाच्या निर्देशानुसार विविध योजनांची तहासभा ठराव क्र. १४३ दि.२०/९/२०१० अन्वये अंबलजावणी करण्याचे दृष्टीने समिती सदस्यांनी काही सूचना केलेल्या असून त्याबाबतचा तपशील येणेप्रमाणे :

१. सोडत पध्द्तीने घरघंटी व शिलाई मशिन याचें वाटप करण्यात यावे.
२. पुढील वर्षी म्हणजे सन २०११-२०१२ महिला व बालकल्याण योजना राबवितांना पालिकेच्या अर्थसंकल्पातच योजनांचा अंतर्भाव व तरतूद करण्यात यावी
३. सन २००९-२०१० या आर्थिक वर्षातील संसारोपयोगी साहित्य व साडी वाटप करण्याचे काम प्रभाग निहाय त्वरीत सुरु करण्यात यावे
४. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत महिला व बालकल्याण समितीचा केरळ-कन्याकुमारी सुमारे आठ दिवसांचा अभ्यास दौरा आयोजित करण्यात यावा . याबाबत समाज विकास अधिकारी,समाज विकास विभाग हयांनी पुढील कार्यवाही करावी.

वरीलप्रमाणे सूचना सन्मा.सदस्यांनी मांडलेल्या असून त्यांस ही समिती मान्यता देत आहे. प्रकरणी आवश्यक ती पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी असे ही समिती ठरवित आहे.

सुचक :-सौ.मीनाक्षी शिंदे अनुमोदक :- सौ.अपर्णा साळवी

सर्वानुमते मंजूर ..

सौ.वनिता गं.इंदिसेः
सभापती
महिला व बालकल्याण समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

मा.सभापती महोदय यांनी सभा दुपारी १२.३० वा. संपल्याचे जाहिर केले.

सचिव कार्यालय ( **मकरंद काळे** )

ठाणे महानगरपालिका,ठाणे. प्र. महापालिका

सचिव

सभा दिनांकः ०८/१२/२०१० ठाणे

महानगरपालिका,ठाणे.

सभा संपल्याची वेळ : दु.१२.३०

**प्रकरण क्र. :- ०६**

विषय :- सन २०१०-२०११ या आर्थिकवर्षात शासनाच्या निर्देशानुसार विविध योजनांची अंमबजावणी करण्याचे दृष्टीने सविस्तर चर्चा करणेयबाबत..

**महिला व बालकल्याण समिती ठराव क्रमांक :- ०६ दिनांक :- ०८/१२/२०१०**

**ठ रा व :**

प्रकरणी चर्चा करतां , सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षात शासनाच्या निर्देशानुसार विविध योजनांची महासभा ठराव क्र. १४३ दि.२०/९/२०१० अन्वये अंबलजावणी करण्याचे दृष्टीने समिती सदस्यांनी काही सूचना केलेल्या असून त्याबाबतचा तपशील येणेप्रमाणे :

१. सोडत पध्द्तीने घरघंटी व शिलाई मशिन याचें वाटप करण्यात यावे.
२. पुढील वर्षी म्हणजे सन २०११-२०१२ महिला व बालकल्याण योजना राबवितांना पालिकेच्या अर्थसंकल्पातच योजनांचा अंतर्भाव व तरतूद करण्यात यावी
३ सन २००९-२०१० या आर्थिक वर्षातील संसारोपयोगी साहित्य व साडी वाटप करण्याचे काम प्रभाग निहाय त्वरीत सुरु करण्यात यावे
४. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था किंवा मा.महासभा ठराव क्र. १४३ दि.२०/९/२०१० अन्वये स्वतंत्ररित्या महिला व बालकल्याण समितीचा केरळ-कन्याकुमारी सुमारे आठ दिवसांचा अभ्यास दौरा आयोजित करण्यात यावा . याबाबत समाज विकास अधिकारी,समाज विकास विभाग हयांनी पुढील कार्यवाही करावी.

वरीलप्रमाणे सूचना सन्मा.सदस्यांनी मांडलेल्या असून त्यांस ही समिती मान्यता देत आहे. प्रकरणी आवश्यक ती पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी असे ही समिती ठरवित आहे.

सुचक :- अनुमोदक :-

सर्वानुमते मंजूर ..

सभापती
महिला व बालकल्याण समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

मा.आयुक्त यांजकडे माहितीसाठी सादर .....

प्रकरण क्र. ०७ः महिला व बालकल्याण समितीचे दि.८ डिसेंबर २०१० रोजीच्या सभेचे इतिवृत्त मंजूर करणेबाबत.

मा.महिला व बालकल्याण समिती ठराव क्रमांक ०७ दिनांक : १३/०१/२०११

ठ रा व :

प्रकरण क्रमांक ०७ पाहता, महिला व बालकल्याण समिती दि. ८ डिसेंबर २०१० या सभेचे इतिवृत्तांत ही समिती कायम करीत असून अंतिम मान्यतेसाठी मा.महासभेपुढे सादर करण्यास शिफारस आहे

सूचक : अनुमोदकः

*सर्वानुमते मंजूर.*

.

सभापती
महिला व बालकल्याण
समिती
ठाणे
महानगरपालिका,ठाणे

मा.आयुक्त यांजकडे माहितीसाठी सादर..

**ठाणे महानगरपालिका,ठाणे.**

सचिव विभाग
ठाणे
महानगरपालिका,ठाणे.
दिनांक :
१३/१/२०११

**मा.महिला व बालकल्याण समिती सभा**
**सभा सूचना क्रमांक ०४दिनांक : ०७/१/२०११**
**सभा क्रमांक ०४ दिनांक १३/१/२०११**

ठाणे महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची स**भा गुरुवार दि.१३/१/२०११ रोजी सकाळी ११.३० वा.** सभा सूचना क्रमांक ०४ दि. ०७/१/२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचारविनिमय करण्यासाठी बोलाविण्यात आली होती.

सदर सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | सौ.वनिता गं. इंदिसे | सभापती |
| २. | श्रीमती छाया म. राव | सदस्या |
| ३. | सौ.महेश्वरी तरे | सदस्या |
| ४. | कु.योगिता र. वैती | सदस्या |
| ५. | सौ.मिनाक्षी रा. शिंदे | सदस्या |
| ६. | सौ.अपर्णा साळवी | सदस्या |
| ७. | सौ.प्रमिला केणी | सदस्या |

**अनुपस्थित सदस्य :-.**

१.	सौ.स्वाती कोमुर्लेकर			सदस्या
२.	सौ.अन्सारी इ. बानू			सदस्या

( राष्ट्रगीताने सभेस सुरुवात होते . )

(मा. सचिव सभेचा अजेंडा वाचून दाखवितांत.)

मा. सचिव प्र.क्र.०७ वाचून दाखवितांत

प्रकरण क्र.०७ मंजूर

सौ.मानकर ,.सचिव : प्र.क्र.०८ वाचून दाखविंतांत

सौ.महेश्वरी तरे :

मा.सभापती महोदया, सभा सुरु करण्यापूर्वी सांगू इच्छिते की, घरघंटी लाभार्थीना वितरण करण्याबाबत मागील बैठकीत सन २००८-२००९,२००९-२०१० या वर्षातील लाभार्थीना प्रथम देण्यात यावे व नवीन योजनेची अंमलबजावणी करावी असे ठरले होते. परंतु हा निर्णय महासभेने रदद् केल्याचे समजते . यामुळे नागरिकांमध्ये असंतोष पसरलेला आहे . मागील दोन वर्षाच्या उर्वरित लाभार्थीना ज्यांना टोकन देण्यात आलेले आहेत त्यांना प्रथम घरघंटीव शिलाई मशिन देण्यात यावी व तसा ठराव आजच्या बैठकीत पारित करावा . कारण मा.महासभेने आपल्याला दि.७/१/२०११ रोजीच्या महासभेत समितीस अधिकार प्रदान केलेला आहे .

कु. योगिता वैती :

मा.सभापती महोदया, सन्मा.सदस्या सौ. महेशवरी तरे हयांनी जी सूचना केलेली आहे त्यास माझे अनुमोदन आहे .

श्री.पवार, उपआयुक्त :

मा. सभापती महोदया, टोकन दिलेल्या लाभार्थीना घरघंटी व शिलाई मशिन देऊ नये याबाबत मा. महासभेने निर्णय घेतलेला होता. त्यात प्रशासन हस्तक्षेप करु शकत नाही . परंतु मा.महासभेने महिला व बालकल्याण समितीस अधिकार प्रदान केलेला असल्यामुळे मागील उर्वरित लाभार्थीना ज्यांना टोकन दिलेले होते त्यांना परत या वर्षी लाभ द्यावयाचा झाल्यास या बैठकीत तसा ठराव पारित करावा .

मा.सभापती :

घरघंटीची किंमत लक्षात घेता मागील वर्षीचे व या वर्षीचे धरुन लाभार्थीचे भॉतिक लक्ष कमी होईल . त्याकरीता जास्तीत जास्त लाभार्थीना लाभ व्हावा याकरीता सरसकट एकच वस्तू

देण्यात यावी व ती कमी किंमतीची असावी असे वाटते . आपण एखादी वस्तू सूचवावी जेणेकरुन जास्तीत जास्त गोरगरीब गरजू महिलांना लाभ होऊ शकेल.

सौ.मिनाक्षी शिंदे :

मा.सभापती महोदया, मा.सभापतींची सूचना रास्त आहे. घरघंटीची किंमत जवळजवळ १३ ते १४ हजारच्या घरात आहे . जर कमी किंमतीची वस्तू दिली तर प्रभागातील अनेक लाभार्थींना याचा फायदा होईल.

तसेच घरघंटी वापरात येत नाही . त्यापेक्षा अन्य वस्तू जी बारा महिने वापरात येईल असे पहावे . तसेच या वर्षीचे योजनांचे फॉर्म अनेक नागरिकांना मिळालेले नाहीत. याबाबत काय कार्यवाही करता येईल.

श्री.पवार, उपआयुक्त

मा.सभापती महोदया, प्रभाग निहाय फॉर्मचे वाटप केलेले आहे . प्रत्येक ठिकाणी समाज विकास विभागाचा कर्मचारी वर्ग दिलेला आहे. असे जर फॉर्म मिळाले नसतील तर त्यांनी लेखी कळवावे . कार्यवाही करण्यात येईल.

सौ.मानकर, महापालिका सचिव :

मा. सभापती महोदया, घरघंटीची किंमत जास्त आहे शिवाय घरघंटी वापरात येत नाही . जर शिलाई मशिन सरसकट वाटप केली तर बारा महिने वापर होईल शिवाय व्यावसायिकदृष्टया उपयोगात राहिल . तरी माझी सूचना आहे की, सरसकट सर्व लाभार्थींना शिलाई मशिन देण्यात यावी .

श्री.पवार, उपआयुक्त :

मा.सभापती महोदया, आजच्या बैठकीत जे निर्णय घेण्यात येणार आहे त्याचे ठराव पारित करण्यात यावे. आजच्या सभेत टोकन रदद् करण्याऐवजी सर्व लाभार्थींना लाभ देण्याबाबतचा ठराव, सरसकट शिलाई मशिन देण्याबाबतचा ठराव, तसेच शिलाई मशिन घेतल्यानंतर संबंधित लाभार्थींना प्रशिक्षण देण्याचा ठराव पारित करण्यात यावा .

प्रकरण क्र. ८ मंजूर

प्रकरण क्र. ९ मंजूर

प्रकरण क्र. १० तूर्त तहकूब . सखोल अभ्यास करुन प्रशासनाने पुढील बैठकीत अहवाल सादर करावा

प्रकरण क्र. ११ :

मा.सभापती :

प्रकरण क्र. ११ चे अनुषंगाने समाज विकास अधिकारी हयांनी प्रकरण सादर करतांना प्रभाग निहाय कंत्राटी पध्द्तीने मनुष्यबळ उपलब्ध करुन देतांना प्रभाग निहाय समुह संघटक व मुख्यालयाकरीता प्रकल्प अधिकारी हयांचा समावेश करण्याबाबत विनंती केलेली आहे . त्यांच्या विनंतीनुसार ठराव पारित करावा .

प्रकरण क्र. ०७ः महिला व बालकल्याण समितीचे दि.८ डिसेंबर २०१० रोजीच्या सभेचे इतिवृत्त मंजूर करणेबाबत.

मा.महिला व बालकल्याण समिती ठराव क्रमांक ०७ दिनांक : १३/०१/२०११

ठ रा व :

प्रकरण क्रमांक ०७ पाहता, महिला व बालकल्याण समिती दि. ८ डिसेंबर २०१० या सभेचे इतिवृत्तांत ही समिती कायम करीत असून अंतिम मान्यतेसाठी मा.महासभेपुढे सादर करण्यास शिफारस आहे

सूचक : सौ.प्रमिला केणी अनुमोदकः योगिता वैती

*सर्वानुमते मंजूर.*

. सौ.वनिता

गं.इंदिसेः सभापती

महिला व बालकल्याण समिती

ठाणे महानगरपालिका,ठाणे

प्रकरण क्र. ०८ः सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षात शासनाच्या निर्देशानुसार विविध योजनांची अंमलबजावणी करण्याचे दृष्टीने सविस्तर चर्चा करणेबाबत.

मा.महिला व बालकल्याण समिती ठराव क्र. ०८ दिनांक : १३/१/२०११

ठ रा व :

प्रकरण क्र. ०८ पाहता व त्यावर चर्चा करता,सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षात महापालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या माध्यमातून एकूण २५ योजना राबविण्यात येणार आहेत. या योजनांची माहिती घेतांना सन्मा.सदस्य हयांनी चर्चेच्या अनुषंगाने सांगितले की, ठाणे महानगरपालिका ठराव क्र. १४३ दि.२०/९/२०१० अन्वये सन २००८-२००९ या वर्षातील योजना क्र. ३ व ४ आर्थिक दुर्बल घटकांतील स्त्रियांना मोफत शिलाई मशिन पुरविणे व घरघंटी पुरविणे यामधील उर्वरित पात्र लाभार्थींना मुदद् क्र. ४ अन्वये सर्व अर्ज व वाटप केलेले

टोकन रदद् करुन नवीन अर्ज स्विकारण्यात यावे असा ठराव पारित केलेला आहे . यावर आजच्या सभेत सन्मा.सदस्यंनी आक्षेप घेऊन अशा प्रकारे मागील वर्षीच्या निर्णयात फेरबदल करुन अर्ज/टोकन रदद् केल्यास नागरिकांमध्ये नाराजी व असंतोष पसरण्याची शक्यता असल्याने मा.महासभेने महिला व बालकल्याण समितीस दिलेले अधिकाराचा वापर करुन सदर ठरावातील मुदद्या क्र. ४ रदद् करण्यात यावा अशी सूचना केलेली आहे.

सन्मा.सदस्यांचे सूचनेनुसार व मा.महासभेने प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन सन २००८-२००९,२००९-२०१० या वर्षातील पात्र १६४० लाभार्थींना उपलब्ध करुन देण्यात आलेले टोकन रदद् करण्यात येत नसून त्यांना पात्र ठरविण्यात येत आहे असे ही समिती ठरवित आहे .

सबब प्रकरणी प्रशासनाने पुढील कार्यवाही सत्वर करावी असे ही समिती ठरवित आहे .

सूचक : सौ.महेश्वरी तरे अनुमोदक : योगिता वैती

सर्वानुमते मंजूर.

सौ.वनिता

गं.इंदिसेः सभापती

महिला व बालकल्याण समिती

ठाणे महानगरपालिका,ठाणे

प्रकरण क्र. ०८ः सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षात शासनाच्या निर्देशानुसार विविध योजनांची अंमलबजावणी करण्याचे दृष्टीने सविस्तर चर्चा करणेबाबत.

मा.महिला व बालकल्याण समिती ठराव क्र. ०८-अ दिनांक : १३/१/२०११

ठ रा व :

प्रकरण क्र. ०८ पाहता व त्यावर चर्चा करता,सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षात महापालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या माध्यमातून एकूण २५ योजना राबविण्यात येणार आहेत. या योजनांची माहिती घेतांना सन्मा.सदस्य हयांनी चर्चेच्या अनुषंगाने सांगितले की, ठाणे महानगरपालिका ठराव क्र. १४३ दि.२०/९/२०१० अन्वये सन २००८-२००९ या वर्षातील योजना क्र. ३ व ४ आर्थिक दुर्बल घटकांतील स्त्रियांना मोफत शिलाई मशिन पुरविणे व घरघंटी पुरविणे यामधील उर्वरित पात्र लाभार्थींना मुदद्या क्र. ४ अन्वये सर्व अर्ज व वाटप केलेले टोकन रदद् करुन नवीन अर्ज स्विकारण्यात यावे असा ठराव पारित केलेला आहे . यावर आजच्या सभेत सन्मा.सदस्यंनी आक्षेप घेऊन अशा प्रकारे मागील वर्षीच्या निर्णयात फेरबदल करुन

अर्ज/टोकन रदद् केल्यास नागरिकांमध्ये नाराजी व असंतोष पसरण्याची शक्यता असल्याने मा.महासभेने महिला व बालकल्याण समितीस दिलेले अधिकाराचा वापर करुन सदर ठरावातील मुदद्‌ क्र. ४ रदद् करुन त्याऐवजी सन २००८-२००९ व २००९-२०१० वर्षातील उर्वरित १६४० लाभार्थींना घरघंटी ऐवजी सरसकट शिलाई मशिन पुरविण्यात यावे तसेच सन २०१०-२०११ मधील पात्र लाभार्थींनाही सरसकट शिलाई मशिन पुरविण्यात यावे अशी सूचना केलेली आहे .

सन्मा.सदस्यांचे सूचनेनुसार व मा.महासभेने प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन सन २००८-२००९ व २००९-२०१०ील उर्वरित १६४० लाभार्थींना सरसकट शिलाई मशिन पुरविण्यात यावे तसेच सन

२०१०-२०११ या वर्षात घरघंटी याजना रदद् करुन सदर योजनेचे आर्थिक व भौतक उददी्ष्ट शिलाई मशिन या योजनेत समाविष्ट करुन शिलाई व घरघंटीकरीता प्राप्त झालेल्या अर्जापैकी पात्र लाभार्थींना सरसकट शिलाई मशिन पुरविण्यात यावे असे ही समिती ठरवित आहे.

सबब प्रकरणी प्रशासनाने पुढील कार्यवाही सत्वर करावी असे ही समिती ठरवित आहे .

सूचक : सौ.महेश्वरी तरे अनुमोदक : योगिता वैती

सर्वानुमते मंजूर.

सौ.वनिता गं.इंदिसेः

सभापती

महिला व बालकल्याण

समिती

ठाणे

महानगरपालिका,ठाणे

प्रकरण क्र. ०८ः सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षात शासनाच्या निर्देशानुसार विविध योजनांची अंमलबजावणी करण्याचे दृष्टीने सविस्तर चर्चा करणेबाबत.

मा.महिला व बालकल्याण समिती ठराव क्र. ०८-ब दिनांक : १३/१/२०११

ठ रा व :

प्रकरण क्र. ०८ पाहता व त्यावर चर्चा करता,सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षात महापालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या माध्यमातून एकूण २५ योजना राबविण्यात येणार आहेत. या योजनांची माहिती घेतांना सन्मा.सदस्य हयांनी चर्चेच्या अनुषंगाने सांगितले की,

ठाणे महानगरपालिका ठराव क्र. १४३ दि.२०/९/२०१० अन्वये सन २००८-२००९ या वर्षातील योजना क्र. ३ व ४ आर्थिक दुर्बल घटकांतील स्त्रियांना मोफत शिलाई मशिन पुरविणे व घरघंटी पुरविणे यामधील उर्वरित पात्र लाभार्थींना मुदद्‌ क्र. ४ अन्वये सर्व अर्ज व वाटप केलेले टोकन रदद्‌ करुन नवीन अर्ज स्विकारण्यात यावे असा ठराव पारित केलेला आहे . यावर आजच्या सभेत सन्मा.सदस्यंनी आक्षेप घेऊन अशा प्रकारे मागील वर्षीच्या निर्णयात फेरबदल करुन अर्ज/टोकन रदद्‌ केल्यास नागरिकांमध्ये नाराजी व असंतोष पसरण्याची शक्यता असल्याने मा.महासभेने महिला व बालकल्याण समितीस दिलेले अधिकाराचा वापर करुन सदर ठरावातील मुदद्‌ क्र. ४ रदद्‌ करुन त्याऐवजी सन २००८-२००९ या आर्थिक वर्षातील उर्वरित १६४० लाभार्थींना घरघंटी ऐवजी सरसकट शिलाई मशिन पुरविण्यात यावे तसेच सन २०१०-२०११ मधील पात्र लाभार्थींनाही सरसकट शिलाई मशिन पुरविण्यात यावे असा ठराव क्र. ८ अ दि.१३/१/२०११ अन्वये पारित करण्यात आलेला आहे .

ठराव क्र. ८ अ दि.१३/१/२०११ अन्वये पारित केलेल्या ठरावानुसार या सर्व पात्र लाभार्थींना योजना क्र. ९ अंतर्गत शिलाई मशिन चालविण्याबाबत प्रशिक्षण देण्यात यावे असे ही समिती ठरवित आहे.

सबब प्रकरणी प्रशासनाने पुढील कार्यवाही सत्वर करावी असे ही समिती ठरवित आहे .

सूचक : सौ.महेश्वरी तरे अनुमोदक : योगिता वैती

सर्वानुमते मंजूर.

सौ.वनिता गं.इंदिसेः

सभापती

महिला व बालकल्याण समिती

ठाणे महानगरपालिका,ठाणे

प्रकरण क्र. ०९ : महिला व बालकल्याण समितीच्या माध्यमातून स्वतंत्ररित्या केरळ कन्याकुमारी अभ्यास पाहणी दौरा आयोजित करणेबाबत.

मा.महिला व बालकल्याण समिती ठराव क्र. ९ दिनांक : १३/१/२०११

ठ रा व :

प्रकरण क्र. ०९ पाहता व सविस्तर चर्चा करतां, महिला व बालकल्याण समितीच्या दैनंदिन कामकाजाता गतीमानता यावी व सुसूत्रता व समानता यावी याकरीता इतर महानगरपालिकांमध्ये महिला व बालकल्याण समितीच्या माध्यमातून दैनंदिन कार्यालयीन कामकाज कसे चालते याचा अभ्यास करणेची आवश्यकता आहे अशी सूचना सन्मा. सदस्यांनी केलेली आहे.

सन्मा.सदस्यांचे सूचनेनुसार , महिला व बालकल्याण समितीच्या माध्यमातून स्वतंत्ररित्या केरळ कन्याकुमारी अभ्यास पाहणी दौ-याचे आयोजन जानेवारीचा शेवटचा आठवडा अथव फेब्रुवारी २११ च्या पहिल्या आठवडयात कमाल आठ दिवसांचा करण्यात यावा असे ही समिती ठरवित आहे .

या अभ्यास दौ-याची पुढील सर्व व्यवस्था उपआयुक्त, ,समाज विकास विभाग हयांनी करावी असे ही समिती ठरवित आहे.

सूचक : सौ.महेश्वरी तरे अनुमोदक : योगिता वैती

सर्वानुमते मंजूर.

सौ.वनिता गं.इंदिसेः

सभापती

महिला व बालकल्याण समिती

ठाणे महानगरपलिका,ठाणे

प्रकरण क्र. १० : औरंगाबाद महापालिकेच्या धर्तीवर ठाणे महापालिका महिला व बालकल्याण समितीस अधिकार प्रदान करणेबाबत..

मा.महिला व बालकल्याण समिती ठराव क्र. १० दिनांक : १३/१/२०११

ठ रा व :

प्रकरण क्र. १० वर चर्चा करतां, ठाणे महापालिकेच्या महिला व बालकल्याण समितीस अधिकार प्रदान करणे हे समितीच्या कामकाजाची व्याप्ती लक्षात घेता आवश्यक आहे . या संदर्भात औरंगाबाद महानगरपालिकेने महिला व बालकल्याण समितीस जे अधिकार प्रदान केलेले आहेत त्याबाबतची सविस्तर माहिती व अहवाल आजच्या बैठकीत उपलब्ध करुन दिलेले नाही त्यामुळै त्यावर अभ्यास करता आलेला नाही . सबब आजच्या बैठकीत निर्णय घेणे शक्य होणार नाही असे मत सन्मा.सदस्यांनी व्यक्त केलेले आहे.

सबब प्रशासनाने प्रकरणी सविस्तर अहवाल सादर करावा तोपर्यन्त सदर प्रकरण तूर्त सखोल अभ्यासाकरीता तहकूब करण्यात येत आहे .

सूचक : सौ.महेश्वरी तरे अनुमोदक : योगिता वैती

सर्वानुमते मंजूर.

सौ.वनिता गं.इंदिसेः
सभापती
महिला व बालकल्याण समिति
ठाणे
महानगरपालिका,ठाणे

प्रकरण क्र. ११ : महिला व बालकल्याण समितीच्या सर्व योजनांची शीघ्रगतीने अंमलबजावणी होण्याकरीता प्रभाग निहाय कंत्राटी पध्द्तीने ( हंगामी धर्तीवर) मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याबाबत.

मा.महिला व बालकल्याण समिती ठराव क्र. ११ दिनांक : १३/१/२०११

ठ रा व :

प्रकरण क्र. ११ वर चर्चा करतां, महिला व बालकल्याण समितीच्या सर्व योजनांची शीघ्रगतीने अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. परंतु या योजनांच्या अंमलबजावणीकरीता प्रभाग निहाय कंत्राटी पध्द्तीने हंगामी धर्तीवर मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याकरीता उपआयुक्त (मुख्यालय) हयांनी शासनाच्या सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनांच्या धर्तीवर नऊ प्रभाग समिती निहाय समुह संघटक ( नऊ ) व मुख्यालयास एक प्रकल्प अधिकारी असे १० पदे कंत्राटी पध्द्तीने ११ महिन्यांच्या करारावर घेण्यातयावीत तसेच त्यांचेमार्फत समाज विकास विभागातील विविध योजना व महिला व बालकल्याण योजना प्रभावीपणे व शिघ्रगतीने अंमलबजावणी

करण्यास मदत होईल.

सबब प्रकरणी उपआयुक्त (मुख्यालय) हयांनी सत्वर कार्यवाही करावी असे ही समिती ठरवित आहे.

सूचक : सौ.महेश्वरी तरे अनुमोदक : योगिता वैती

सर्वानुमते मंजूर.

सौ.वनिता गं.इंदिसे:
सभापती
महिला व बालकल्याण समिती
ठाणे महानगरपालिका,ठाणे

मा.सभापती महोदय यांनी सभा ठीक सायं.४.४५ वा. संपल्याचे जाहिर केले.

सचिव कार्यालय (सौ.छाया मानकर )
ठाणे महानगरपालिका,ठाणे. महापालिका सचिव
सभा दिनांक:१३/०१/२०११ ठाणे महानगरपालिका,ठाणे.
सभा संपल्याची वेळ : दु.१.३० वा